Deshdoot Paper:- 06/12/2021



# मंगरुळ परिसरात काकडी लागवड

## चांगल्या वाणाची निवड केल्याने गुजरात, मुंबईत मागणी

▶▶ मंगरूळ, ता.पारोळा । प्रतिनिधी

पारोळा तालुक्यातील मंगरूळ परिसरात दरवर्षी काकडी लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. मंगरूळ येथील शेतकरी चांगल्या काकडी वाणाची निवड करून लागवड करत असतात. त्यामुळे काकडी सोपिया व्हरायटी उत्पन्नात चांगली वाढ झाल्याने शेतकरी आनंदीत आहे. याचा इतरही शेतकऱ्यांना फायदा व्हावा यासाठी येथे पिक पाहणी कार्यक्रम व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मंगरूळ, मोरफळ, धुळपिंप्री, चबुत्रे या परिसरात ७५ टक्के शेतकरी काकडीची लागवड करून भरघोस उत्पन्न घेत आहेत. येथील प्रगतशील शेतकरी सोपिया आणि शहिनी काकडी (एक्सन हायवेज प्रा.लि.) या वाणाची निवड केल्याने त्यानी एकरी आठ तोड्यात १२ ते १५ टन उत्पन्न मिळाले ही काकडी सुरत (गुजरात व मुंबई (वाशी) मार्केटला विकली जात आहे. काकडीला २० ते २५ रूपये किलो भाव मार्केटमध्ये मिळत आहे. शेतकरी मेळाव्यात कंपनीचे प्रतिनिधी गुणवंत सुर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून त्या गावातील सरपंच रतन पाटील, प्रगतशिल शेतकरी धिरज पाटील, साई अ‍ॅग्रो मंगरूळ, बालाजी अ‍ॅग्रो पारोळा, आदर्श कृषी मोरफळ, गुणवंत सुर्यवंशी व टिम आदिंसह बियाणे विक्रेते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.